Dhanji Devsey Arts College Wada Dist.Palghar ...ence & Scie...

# महाराष्ट्र शासन

विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर, पनवेल, जि.रायगड - ४१० २०६.

ई-मेल पत्ता :- jdhekvp@Rediffmail.com
दूरध्वनी व फॅक्स नंबर (०२२) २७४५३८२०.

जा.क्र.सहसं/उशि/कोविप/मशि.१/विशा/२०१३/19359 दि. २३/०८/२०१३

06-10-13

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, शिक्षक संचलित शिक्षण संस्थेचे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये.वाडा जि.ठाणे येथे शासन आदेश क्र. अनुदा-२०११/(२००/११)/मशि-४, दि. ०२/०१/२०१३ नुसार या महाविद्यालयास पदवी स्तरावर **प्रथम वर्ष विज्ञान शाखेस** सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षापासून उपरोक्त शासन आदेशातील क्र.१ ते ९ प्रमाणे अटी व शर्तीना अनुसरुन तालूक्यातील एकमेव विद्याशाख म्हणून १०० टक्के अनुदानित तत्वावर सुरु करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. शासन आदेशातील अटी व शर्तीप्रमाणे संस्था महाविद्यालयाकडून रु. १००/- च्या भारतीय गैरन्यायिक मुद्रांक पेपरवर उपरोक्त अभ्यासक्रम/विद्याशाखा/तुकडी/विषय चालविण्यासाठी हमीपत्र संस्थेकडून / महाविद्यालयाकडून दि. ०१/०६/२०१३ अन्वये शासन निर्देशाप्रमाणे या कार्यालयाकडे सादर केलेले आहे.

"महाराष्ट्र विद्यापीठ कायदा -१९९४" अंतर्गत तसेच विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली. यांच्या मार्गदर्शक तत्वानुसार व वेळोवेळी निर्गमित होणा-या अधिसुचनेनूसार नवीन महाविद्यालय/विद्याशाखा/अभ्यासक्र/विषय व अतिरिक्त तुकडया चालविण्याच्या दृष्टीने पुरेशा प्रमाणात इमारत, वर्ग खोल्या, सेमिनार हॉल, ग्रंथालय, क्रिडांगण इ. सुसज्ज पायाभूत सोई सुविधा परिपूर्ण असणे आवश्यक आहे. मर्यादित विद्यार्थी प्रवेश तसेच प्रवेशित विद्यार्थी संखेच्या विगतवारीसह नियतकालीक आढावा, नॅक ॲक्रिडिएशन बाबत कारावयाची कार्यवाही करणे आवश्यक आहे. U.G.C. च्या मार्गदर्शक तत्वानुसार शैक्षणिक अर्हताधारक अनुभवी प्राचार्य, ग्रंथपाल व अध्यापक वर्ग आणि अर्हताधारक व अनुभवी शिक्षकेतर कर्मचारी वर्ग नियुक्त करण्याच्या अटींवर मान्यता देण्यात येत आहे. प्रवेश क्षमतेच्या ५०% हून कमी प्रवेश झाल्याचे आढळून आल्यास. शासन आदेशात नमूद केल्यानुसार सदर नवीन महाविद्यालय, विद्याशाखा, अभ्यासक्रम, विषय, अतिरीक्त तुकडीचे "असलंग्नीकरण" (deaffilation) करण्यात येवून. मंजुरी आदेश रद्द करण्यात येतील. वरील अटीच्या अधिन राहून शासन निर्णयातील सुचनांप्रमाणे विद्यापीठाने या संस्थेच्या महाविद्यालयाच्या वर उल्लेखित नवीन महाविद्यालय/विषय/तुकडी/विद्याशाखा/अभ्यासक्रमासाठी पुढील संलग्नीकरणाची प्रक्रिया सुरु करण्यास या कार्यालयाची मान्यता आहे.

A. & C. COLLEGE. WADA
Date 7/10/2013
Signature
Inward No. 2...

(सही)
विभागीय सहसंचालक, 7/10/13
उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

स्थळ :- पनवेल
दि. २३/०८/२०१३
प्रत :-

१. कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई -३२ / एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, चर्चगेट, मुंबई - २० त्यांना सुचित करण्यात येते की. विद्यापीठांनी त्यांच्या संलग्निकरणात येत असलेल्या या महाविद्यालयाच्या वरील मंजूरी मिळालेल्या अभ्यासक्रमांचे / विद्याशाखांचे विहित शैक्षणिक शुल्क, विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या भौतिक सुविधा, पात्रताधारक अध्यापक वर्ग व तत्सम स्वरुपाच्या आवश्यक असणाऱ्या बाबी पूर्ण करण्याच्या सूचना, तसेच बार कौंसिल ऑफ इंडिया, एन.सी.टी.ई / ए.आय.सी.टी.ई., नॅक यांचेकडील ना- हरकत प्रमाणपत्र तात्काळ प्राप्त करण्याच्या सुचना पुनश्च: उपरोक्त संस्थेच्या निदर्शनास आणून द्याव्यात.
उपरोक्त मान्यता नवीन महाविद्यालय/ अभ्यासक्रम/ विद्याशाखा/ विषय/ तुकडया सुरु करण्यात आलेल्या महाविद्यालयांनी ज्यांची स्थापना होऊन ५ वर्ष झाली आहेत त्यांनी एक वर्षात व ज्यांची ५ वर्षे झालेली नाहीत त्यांची ५ वर्षे पूर्ण होताच एक वर्षात नॅक ॲक्रिडिएशन प्राप्त करुन घ्यावे व ते या कालावधीत न मिळविल्यास सदर विद्याशाखा मान्यता आपोआप रद्द होईल. तसेच शासन निर्णयानूसार कळविण्यात आल्याप्रमाणे शासनाने दिलेल्या अटी व शर्ती यांचे पालन होते किंवा नाही याबाबत खात्री करुन संलग्निकरणाचा अहवाल शासनास व संचालनालयास पाठवून केलेल्या कार्यवाहीची प्रत या कार्यालयास पाठवावी.

(सही)
PRINCIPAL
Shikshak Sanchalit Shikshan Sanstha's
Dr.Shantilal Dhanji Devsey Arts College
& Commerce & Science College
Wada,Dist.Palghar

C:\Documents and Settings\JDHE\Desktop\nikale m.v\Certificate.docx